पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात शहीद दिनानिमित्त अभिवादनप्रसंगी मान्यवर.

# विद्यापीठात शहीद दिनानिमित्त अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्तेशहीदांच्याप्रतिमांनापुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठता तथा तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. डी. पाटील आदी उपस्थित होते.

लोकमत

# डॉ. संजय मालपाणी यांना ज्ञानदीप पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** श्री स्वामी समर्थ सार्वजनिक भक्त मंडळातर्फे ज्ञानेश्वर हरी काटकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा ज्ञानदीप पुरस्कार यंदा डॉ. संजय मालपाणी (संगमनेर) यांना देण्यात येणार आहे. श्रीफळ, शाल, गौरवपत्र, सन्मानचिन्ह, एक लाख रुपये असे पुरस्कारचे स्वरूप आहे. येत्या गुरुवारी सायंकाळी सात वाजता शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार मार्केट यार्डातील मंदिरात देण्यात येणार आहे. मालपाणी हे गीता परिवार या संस्थेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत. मंदिरात २७ मार्चला नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, २९ आणि ३० मार्चला धनश्री लेले यांचे, तर १ एप्रिलला प्रा. डॉ. दिनेश रसाळ यांचे व्याख्यान होईल.

पुढारी

# 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थी बनला राजपत्रित अधिकारी

## सुनील पाटील यांची सहायक रासायनिक विश्लेषकपदी निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठातील 'कमवा आणि शिका' योजनेंतर्गत काम केलेले सुनील बाळासाहेब पाटील यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा (एमपीएससी) मार्फत सहायक रासायनिक विश्लेषकपदी राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाली.

एमपीएससीमार्फत २०१८-१९ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले आहेत. त्यानुसार महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर सहायक रासायनिक विश्लेषक (राजपत्रित) पदावर त्यांची प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे येथे नेमणूक झाली आहे. सुनील पाटील यांचे मूळगाव इचलकरंजी आहे. त्यांचे पदवी शिक्षण क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा व एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर येथे झाले.

विद्यापीठाच्या डॉ. अप्पासाहेब पवार कमवा व शिका योजनेंतर्गत २००९ ते २०११ या काळात त्यांनी रसायनशास्त्र अधिविभागातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्यांनी राजाराम महाविद्यालय, घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज व डी. आर. माने महाविद्यालय, कागल येथे रसायनशास्त्राचे हंगामी सहायक प्राध्यापक म्हणून काम केले. २०१३ पासून ते एमपीएससी परीक्षेचा अभ्यास करत होते. २०१९ ला सहायक रासायनिक विश्लेषकपदाचा निकाल जाहीर झाला. दोन वर्षांनंतर प्रशासकीय प्रक्रियेनंतर त्यांच्या निवडीचा आदेश निघाला आहे.

> 'कमवा व शिका' योजनेत काम करून दहावीनंतरचे शिक्षण पूर्ण केले. एमपीएससीकडून निवड झाल्याचा आनंद आहे. केंद्रीय स्तरावरील पुढील संधीचा शोध घेऊन त्यादृष्टीने वाटचाल करणार आहे.
>
> - सुनील पाटील

सकाळ

# मधमाशी पालनातून यशस्वी उद्योजक बना : संजय माळी

## राधानगरीत एकदिवसीय कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर, ता. २४ :** मधमाशी पालनातून यशस्वी उद्योजक बना, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी केले. कणेरी मठ येथील मधूअमृत मधमाशी संवर्धन संशोधन सेंटर व वन विभाग (राधानगरी), ग्रीन गुड लक फार्मर प्रोड्यूसर कंपनी व कृषी विभाग, आत्मा (राधानगरी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय मधमाशी पालन कार्यशाळेत ते बोलत होते. राधानगरी येथे कार्यशाळा झाली.

माळी म्हणाले, "मधमाशी पालनातून आर्थिक स्थिती सुधारू शकतो. रोजगाराचा हा चांगला मार्ग आहे. त्यातून पीक उत्पादनातही वाढ होते. उद्योजकता विकास केंद्र हा व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांसाठी मदत करण्यास तत्पर आहे."

क्युबातील राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाचे सल्लागार डॉ. ए. डी. जाधव म्हणाले, "शेतकरी व विद्यार्थी एकत्र आले तर एखादा उद्योग सहज उभा राहू शकतो. मधमाशी पालन व्यवसायाकडे शेतीपूरक व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे."

तालुका कृषी अधिकारी शिंगे यांनी मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्राचे गणेश पोवार यांनी मधमाशांवरील रोगांची माहिती दिली. मधपाळ विश्वास ढोकरे, धर्माजी कांबळे, दिगंबर पाटील यांनी मधमाशी पेटीची हाताळणी कशी करायची याचे प्रात्यक्षिक दाखविले. मधूअमृतचे सचिव दयावान पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शंकांचे निरसन केले. सरपंच कविता शेट्टी यांनी प्रास्ताविक केले. आत्मा कमिटीचे सदस्य दीपक शेट्टी यांनी संयोजन केले. डॉ. भोजे यांनी आभार मानले.

सकाळ

# डॉ. संजय मालपाणी यांना ज्ञानदीप पुरस्कार जाहीर

## प्रज्ञापुरीमध्ये गुरुवारी होणार वितरण



संजय मालपाणी

कदमवाडी, ता. २४ : येथील प्रज्ञापुरीतील श्री स्वामी समर्थ सार्वजनिक भक्त मंडळातर्फे ज्ञानेश्वर हरी काटकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ज्ञानदीप पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार यंदा संगमनेरच्या डॉ. संजय मालपाणी यांना जाहीर झाला आहे. गौरवपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख एक लाख रूपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गुरुवारी (ता.३१) सायंकाळी सातला शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वितरण होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष नारायणराव बुधले यांनी दिली.

डॉ. मालपाणी गीता परिवार या संस्थेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष असून, देशातील पंचवीस राज्यांत मूल्यशिक्षण आणि योगाचा प्रचार व प्रसार करत आहेत. आठ हजारांवर विद्यार्थी संख्या आणि सुमारे पन्नास एकरात विस्तारलेल्या संगमनेर महाविद्यालयाचे ते अध्यक्ष आहेत.

दरम्यान, यंदाच्या स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळ्यात नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात, धनश्री लेले, डॉ. दिनेश रसाळ, रविंद्र अग्निहोत्री यांची प्रवचने होणार आहेत. रविवारी (ता.३) प्रकट दिन सोहळा होणार असल्याचेही बुधले यांनी सांगितले.

2 5 MAR 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राधानगरीत मधुमक्षिका कार्यशाळा

## शिवाजी विद्यापीठ, ग्रीन गुडलक, आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम

प्रतिनिधी
राधानगरी

शिवाजी विद्यापीठ किटकशास्त्र विभाग,राधानगरी येथील ग्रीन गुडलक फार्मर प्रोड्युसर कम्पनी,वनविभाग राधानगरी, महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि आत्मा राधानगरी यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी आणि किटकशास्त्र विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय मधमाशीपालन कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी मधुमक्षिका पालन पूरक व्यवसाय, मधमाशा जीवसृष्टीतील कार्य आणि महत्व,मधुमक्षिकापालन शासकीय योजना आणि बेसिक प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी शिवाजी विद्यापीठ कीटकशास्त्र विभागाचे प्रा डॉ ए डी जाधव यांनी संशोधन आणि शेतकरी यांच्यातील गॅप कमी करण्याचं काम कार्यशाळा करतात



राधानगरी येथे मधुमक्षिका पालन प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा, के डी जाधव, सोबत दिपक शेट्टी, दयावान पाटील आदी

आत्मा समिती सदस्य आणि ग्रीन गुडलक फार्म प्रोड्युसर कंपनीचे चेअरमन दीपक शेट्टी यांनी राधानगरी तालुक्यातील निसर्ग वैभव स्पष्ट केले. आणि शेतकऱ्यांना रोजगाराचे मार्गदर्शन केले.

किटकशास्त्रज्ञ प्रा. आप्पासाहेब भुसनाळ यांनी एकेकाळी कीटकनाशक फवारणीशिवाय चांगली पीक येत होती.पिकांवर फवरण्यात येणारी कीटकनाशके मध मधमाश्यांना कर्दनकाळ ठरत असल्याचे वास्तव स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र शासन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी रोजगार निर्माण करणाऱ्या विविध कौशल्य प्रशिक्षण योजनांची माहिती दिली. दयावान पाटील,आत्मा विभागाचे सुनील कांबळे, राधानगरीच्या सरपंच कविता शेट्टी,कृषी विज्ञान केंद्र तळसंदेचे गणेश पोवार,प्रगतशील शेतकरी तानाजी निकम यांनी मनोगत व्यक्त केली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी डी एस शिंगे ,डॉ पी एम भोजे,डॉ रेश्मा सनदी, अश्विनी जाधव,महेश अडसूळ, राम कदम,डॉ, सुभाष इंगवले , यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

Times of India

# SUK to conduct re-exam for students hit by tech glitches

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked the BA, B.Com and BSc students, who faced technical issues while appearing for the winter semester exams online, to submit online forms by April 1 stating the difficulty they faced while taking the test.

All the students will get a chance to reappear for the examination. Gajanan Palse, in-charge director for exam and evaluation department of SUK, said, "The winter semester examination for BSc, BCom and BA were conducted online from February 14. Due to technical errors and glitches, few students were unable to give their exams therefore the SUK appeals to such students to visit http://www.unishivaji.ac.in/online_portal/ website and then fill up details of the exam that they missed and fill up another form online on the link http://studentapps.unishivaji.ac.in/oct21Re-exam for re-examination."

File photo



All the students will get a chance to reappear for the examination

**Due to technical errors and glitches, few students were unable to give their exams**

He added, "The link mentioned to fill the details will be available from March 23 to April 1, 2022. For those students whose exams are currently ongoing and if they face any difficulty due to any technical glitch then they should also fill the online form. However, this link is not for first year students who appeared for the exam conducted at the college level."